म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा वा
दा. क्र. ८२६६

…य माला २०१ वे



# भारतीय सण व उत्सव

प्रा. कुमुदिनी रांगणेकर

IRBK-0106268
IRBK-0106268

आश्विन

दा० ग्र०
६२६८

स्वाध्यायमाला : पुष्प २०७ वें प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# आश्विन मास

२२६३०

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

संपादक मंडळ
डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्.डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी.,
बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.),
एम्. ईडी.
श्री. शं. दा. चितळे

IRBK-0106268

IRBK-0106268

१८७८ ] किंमत ४० नये पैसे [ १९५७

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं भेट देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास– यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

२२२३५
वा. ने
८३
३०

# आश्विन मास

सहा महिने--अर्धें वर्ष--संपलें. आतां वर्षाचा दुसरा अर्धा भाग सुरू होत आहे. नि आश्विन हा त्यांतला पहिला महिना. आपण जे साडेतीन मुहूर्त मानतों ना ? त्यांतला दीड मुहूर्त वर्षाच्या पहिल्या भागांत आला होता. पहिला चैत्र महिन्यांत गुढी-पाडवा हा एक मुहूर्त नि पुढला वैशाख महिन्यांत अक्षय्य-तृतीया हा अर्धा मुहूर्त ! गंमत अशी कीं, वर्षाच्या ह्या दुसऱ्या भागांतहि असेच ओळीनें दोन मुहूर्त येतात. ह्या भागांतील पहिला महिना आश्विन--नि आश्विन शुद्ध दशमीला दसऱ्याचा मुहूर्त असतो, आणि पुढच्या कार्तिक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेला बळी पाडावा हा मुहूर्त असतो !

वर्षाच्या दोन भागांपैकीं प्रत्येक भागाच्या आरंभींच्या दोन महिन्यांत दोन मुहूर्त येतात बरं ! कोणत्याहि कामाची सुरुवात चांगल्या वेळीं केली कीं तें काम नीट पार पडतें. कारण आपल्याला शुभ मुहूर्ताचा आधार आहे, असा विश्वास मनाला वाटतो नि त्यामुळें आपलें नैतिक, मानसिक व शारीरिक बळ वाढतें.

म्हणूनच नव्या वर्षाच्या आरंभींच्या दोन महिन्यांत दोन मुहूर्त येत असतात. चांगला दिवस हाताशीं नाहीं म्हणून अळंटळं करावयास नको ! घ्या शुभ मुहूर्त नि करा शुभ कार्याला प्रारंभ !

ह्याचप्रमाणें पुढल्या सहामाहींतहि पहिल्या दोन महिन्यांत उत्तम दोन मुहूर्त हजर ठेवले आहेत. त्याचा फायदा मात्र करून घ्यायला हवा प्रत्येकानें.

पहिल्या सहामाहींत अभ्यासाचें बूड चांगलें स्थिर झालें नाहीं. हरकत नाहीं ! पुढल्या सहामाहींत दसऱ्याच्या मुहूर्तावर अभ्यासाची मोहीम सुरू करा. नक्की फत्ते व्हाल !

पूर्वी मोठे मोठे वीर दसऱ्याच्या मुहूर्तावरच शिलांगणाची स्वारी काढीत नि शत्रूचा पराभव करीत. तुम्हींहि आळसरूपी शत्रूचा पराभव करा नि परीक्षेंत विजयी व्हा.

तेव्हां आश्विन महिना मोठा चांगला आहे. आतां चौथा ऋतु शरद् सुरू होतो आहे. ह्या दिवसांत दक्षिणेकडील मलय पर्वतावरून थंड वारे वाहात येतात. पावसाळ्याचा जोर कमी असतो नि आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्राच्या उत्सवाला नि आनंदाला सुरुवात होते.

**नवरात्राचा उत्सव**

आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध नवमीपर्यंत महिषासुर-मर्दिनी देवीचा उत्सव साजरा करतात.

ऐका हं ह्या देवीच्या जन्माची कथा. फार पूर्वी स्वर्गांत महिषासुर ह्या नांवाचा एक राक्षस फार उन्मत्त झाला होता. सर्वांवर आपली सत्ता चालावी म्हणून त्यानें इंद्राचा अधिकारहि

आपल्या हातीं घेतला. नि त्याची सत्ता म्हणजे काय ? अंधेर-नगरींतली बेबंदशाहीच जणूं !

सृष्टीवर मोठा अनर्थच ओढवला. सर्व देव भयभीत झाले. आणि ह्या महिषासुराच्या त्रासांतून सृष्टीला सोडवा, अशी त्यांनीं त्रिमूर्तींना विनंति केली. त्रिमूर्ति म्हणजे ब्रह्मा, विष्णु व महेश. महिषासुराच्या दुष्ट कृत्यांची हकीकत ऐकून ह्या तिघांना फार चीड आली आणि त्यांनीं आपल्या अंशापासून एक देवी उत्पन्न केली.



तिला आठ हात होते म्हणून तिला अष्टभुजा म्हणत. सर्व तऱ्हेच्या शस्त्रस्त्रांनीं तिला सज्ज करून महिषासुराशीं लढाई करण्यास धाडण्यांत आलें.

आश्विन शुद्ध प्रतिपदेला ह्या युद्धाला सुरुवात झाली नि शुद्ध नवमीपर्यंत—म्हणजे नऊ दिवस तें चाललें होतें. अखेरीस देवीनें महिषासुराला मारलें नि सृष्टीला जाचांतून सोडविलें. त्यामुळें तिचें महिषासुरमर्दिनी असें नांव पडलें. नवरात्रांत तिचा उत्सव थाटानें साजरा होऊं लागला.

दुष्टाचा नाश झाल्यामुळें त्या वेळीं सर्व सृष्टि आनंदांत होती. नि आजकालसुद्धां नवरात्रांत हा आनंद व्यक्त करण्यांत येतो. आपला देश शेतीप्रधान आहे. शेती हा आपला मुख्य धंदा आहे. त्यामुळें शेती मनासारखी पिकणें हें आनंदाचें लक्षण मानलें जातें.

नवरात्राच्या पहिल्या दिवशीं जमीन सारवून त्यांत नऊ तऱ्हेचीं धान्यें रुजवितात. मध्यभागीं कलश ऊर्फ घट ठेवतात नि त्याला रोज वाढती माळ घालतात. म्हणजे पहिल्या दिवशीं एक, दुसऱ्या दिवशीं दोन अशा. रुजवलेल्या धान्याला पाणी घालतात नि बाजूला नंदादीप नऊ दिवस अखंड तेवत ठेवतात. हळूहळू पेरलेलीं धान्यें उगवूं लागतात. कांहीं जरा लौकर, कांहीं थोडीं उशिरां, मात्र धान्यांचे हे अंकुर पांढरट दिसतात. कारण हें ‘शेत’ घरांत असतें ना? मग ऊन लागल्याशिवाय हिरवा रंग कसा चढणार? नंतर त्या उगवलेल्या रोपटांवर हळदीचें पाणी मारतात. तें धान्य सोन्यासारखें दिसावें म्हणून! कारण धान्यामुळेंच धन–पैसा–मिळतें!

नवरात्रांतील तो देखावा फार शांत, भव्य दिसतो! तो पहातांना मनाला कसें तृप्त वाटतें!

नवरात्रांतील सातव्या दिवशीं सरस्वतीची–विद्येच्या देवीची–पूजा करतात. आजकाल घरांत पोथ्या असण्याचीच पंचाईत!

तेव्हां त्या दिवशीं आपल्या घरांतील पुस्तकांच्या कपाटांची साफसफाई अवश्य करावी. त्यामुळें विद्यादेवीचा मान केला जाईल!

नवरात्रांतील नवव्या दिवसाला खंडेनवमी म्हणतात. आणि रात्रींच्या वेळीं गुजराथी स्त्रिया घटाभोंवती फेर धरून गातात व नाचतात. 'गरबा' म्हणतात ह्या नृत्याला.

हल्लींसुद्धां गुजराथी हरिजन स्त्रिया घट नि दिवा घेऊन नवरात्रांत रस्तोरस्तीं 'गरबा' खेळतात.

बंगाल प्रांतांत तर अष्टभुजा देवीच्या सणाला आपल्या-कडील दिवाळीच्या सणाचें महत्त्व असतें. त्या देवीला ते काली किंवा दुर्गा म्हणतात. देवीच्या समोर गायन, वादन, नृत्य, नाटक हे प्रकार होतातच; पण देवीपुढें बकरा बळी देण्याचीहि पद्धत आहे. आपल्या महाराष्ट्रांत सुद्धां खंडोबा वगैरे कांहीं प्रखर देवतांच्या समोर कोंबड्या, बकऱ्याचा बळी देतात. ही प्रथा अगदीं वाईट आहे. त्याऐवजीं पिठाचा बकरा किंवा पिठाचा कोंबडा करून त्याचा बळी अर्पण करावा. पण कांहीं माणसें 'जुनें तें सोनें' म्हणूनच बसतात ना? हवें तर तुम्हीं 'नवें तें हवें' म्हणूं नका आणि सर्व जुनें दूर लोटूं नका. पण जुन्यांतलें वाईट तरी बाजूला टाका नि चांगलें तेवढेंच घ्या आणि त्यांत नव्यांतील चांगलें मिसळा नि तडजोडीचा मधला मार्ग काढा. प्रत्येक गोष्ट श्रद्धेनें करावी. पण डोळसपणें करावी. कारण अंधश्रद्धा घातक ठरते! आपले वाडवडील करीत त्या गोष्टींच्या मुळाशीं असलेले हेतु लक्षांत घ्यायला हवेत. नि आज-कालच्या परिस्थितीशीं जुळेल असें स्वरूप त्यांना द्यायला हवें! त्यामुळें नव्या पद्धतीनें केलेल्या त्या जुन्या गोष्टी कशा सुटसुटीत वाटतील नि आपल्या हल्लींच्या जीवनांत मिसळून जातील

आणि जुन्या सणांचा व रूढींचा आपल्याला भलताच बोवाळ वाटणार नाहीं !

**दसरा**

आतां नवरात्र संपलें ! आणि दसरा उजाडला ! दसरा हा शब्द दश म्हणजे दहा ह्यावरून आला असून त्याचा अर्थ दहावा दिवस असा आहे. ह्याला **विजयादशमी** असेंहि म्हणतात. कारण ह्याच दिवशीं श्रीरामानें रावणावरोबर युद्ध करण्यास कूच केलें. आणि ह्या स्वारींत त्याला विजय प्राप्त झाला. म्हणून ह्या दशमीला लोक विजयादशमी म्हणू लागले.

ह्या दिवशीं एकमेकांना सोनें म्हणून आपट्याचीं पानें वांटण्याची पद्धत आहे. त्याला पुढील कथा कारण आहे.

फार प्राचीन काळीं कौत्स नांवाचा एक ब्राह्मण मुलगा वरतंतु नांवाच्या ऋषीकडे विद्या मिळविण्यासाठीं गेला. योग्य वेळीं त्यानें सर्व शास्त्रांचा अभ्यास पुरा केला व " आतां गुरुदक्षिणा स्वीकारा " असा त्यानें आग्रह धरला. गुरु म्हणाला, " कौत्सा, दक्षिणेसाठीं विद्यादान करणें गैर आहे. शिष्य विद्वान् झाला म्हणजे गुरूला मोठा आनंद होतो नि तीच खरी गुरुदक्षिणा ! "

पण गुरूचें ऋण फेडणें हें आपलें कर्तव्य आहे, असें कौत्साला वाटत होतें. तो पुनःपुन आग्रह करूं लागला. तेव्हां वरतंतु ऋषीनें म्हटलें, " मीं दक्षिणा घ्यावी असा तुझा आग्रहच आहे तर ? ठीक ! मी तुला चौदा विद्या शिकविल्या. त्या प्रत्येक विद्येबद्दल एक कोटि याप्रमाणें चौदा कोटि मोहरा मला आणून दे. "

कौत्साकडे एवढ्या सुवर्ण मोहरा कुठून असणार ? पण त्यानें आपला शब्द दिला होता. तेव्हां तो रघुराजाकडे गेला.

रघुराजा हा श्रीरामाचा पूर्वज. हा मोठा उदार व विद्वानांना आश्रय देणारा होता. परंतु त्याच वेळीं रघुराजानें नुकताच विश्वजित् यज्ञ केला होता. आणि ब्राह्मणांकडून आपला सर्व खजिना लुटला होता. त्यामुळें त्याच्याकडे चौदा कोटि मोहरा नव्हत्या. परंतु दारीं आलेल्या ब्राह्मणाला तसाच परत पाठविणें त्याला बरें वाटेना. त्यानें कौत्साकडून तीन दिवसांची मुदत मागून घेतली व मोहरा मिळविण्याकरितां तो इंद्रावर स्वारी करण्यासाठीं निघाला. ही गोष्ट इंद्राला कळतांच त्यानें कुबेराला बोलाविलें. कुबेर हा धनाचा देव आहे. देवांच्या द्रव्याचें भांडार तो राखत असतो. इंद्रानें कुबेराला सांगितलें कीं, "रघुराजाच्या अयोध्यानगरीच्या बाहेर असलेल्या शमीच्या नि आपट्याच्या झाडांवर मोहरांचा पाऊस पाड!"

कुबेरानें त्याप्रमाणें मोहरांचा पाऊस पाडला. तें पाहून, रघुराजानें इंद्रावर स्वारी करण्याचा बेत सोडला आणि त्यानें कौत्साला त्या सर्व मोहरा दान केल्या. नि कौत्सानें त्या वरतंतु ऋषीला अर्पण केल्या; परंतु ऋषीनें फक्त चौदा कोटी मोहरा स्वीकारल्या आणि बाकीच्या कौत्साला परत दिल्या. वास्तविक त्या सर्व मोहरा रघुराजानें कौत्साला दिल्या होत्या. तेव्हां कौत्सानें त्या स्वतःला ठेवून घेण्यास हरकत नव्हती. पण त्यानें त्या आपल्यासाठीं का मागितल्या होत्या? त्याला फक्त आचार्य-ऋण फेडावयाचें होतें! स्वतःसाठीं त्याला त्या धनाचा लोभ वाटला नाहीं! त्याच्यापाशीं विद्याधन भरपूर होतें ना? त्या विद्याधनाच्या बळावर त्याला मान मिळाला असता नि गरजेपुरतें धनहि मिळालें असतें! त्या काळीं धनापेक्षां मानाचें महत्त्व अधिक होतें! नि इतर धनांपेक्षां विद्याधनाला विशेष मान असे!

त्यामुळें आतां त्या उरलेल्या मोहरांचें काय करावयाचें, हा प्रश्न पडला कौत्साला. त्यानें त्या रघुराजाला परत घेण्याचा आग्रह केला. पण रघुराजा त्या परत घेईना.

बरोबरच आहे! त्या दान केल्या, असा एकदां शब्द गेला होता. मग गेलेला शब्द का परत घ्यावयाचा?

शेवटीं कौत्सानें अयोध्या नगरींतील लोकांकडून त्या लुट-विल्या. हा दिवस विजयादशमीचा होता नि ह्या घटनेची आठवण म्हणून आपटयाचीं पानें लुटण्याचा प्रघात पडला.



एकमेकांना त्या दिवशीं हें 'सोनें' देण्यांत येतें. नुसती रीत म्हणून सोनें देवाण-घेवाण करण्यापेक्षां मनापासून करावें. शेजाऱ्या-पाजाऱ्याशीं तंटाभांडण झालें असेल तर ह्या निमित्तानें तें विसरून जावें.

पूर्वींच्या काळीं दसऱ्याच्या मुहूर्तावर सीमोल्लंघन करीत. त्याचाच शिलंगण हा अपभ्रंश झाला आहे. सीमोल्लंघन करणें म्हणजे आपल्या देशाची सीमा ओलांडून—उल्लंघून—दुसऱ्या देशावर स्वारी करणें आणि ह्या कामाला हा काळ अगदीं योग्य असतो. पावसाळा संपत आल्यामुळें नद्यांचे पूर ओसरलेले असतात. शिवाय पूर्वींच्या काळीं लढाईवर जाणारे सारेच लोक धंदेवाईक

सैनिक नसत. त्यांपैकीं पुष्कळसे लोक शेतीचा धंदा करीत नि विजयादशमीच्या सुमाराला शेतीचीं कामें आटोपत आलेलीं असतात. त्यामुळें शेती सोडून ते मुलुखगिरीवर जाऊं शकत. तेव्हां अनायासें त्याच वेळीं येणारा दसऱ्याचा मुहूर्त ते साधीत.



दसऱ्याच्या दिवशीं शस्त्रास्त्रांची पूजा करतात. ह्यासंबंधीं अशी कथा आहे कीं, पांडव वनवासाला गेले नि जाते वेळीं त्यांनीं आपलीं शस्त्रें एका शमीच्या झाडाच्या ढोलींत ठेवलीं. पुढें त्यांचा वनवास संपला. त्यानंतरचा एका वर्षाचा अज्ञातवास संपला आणि विजयादशमीला त्यांनीं आपलीं शस्त्रें ढोलीबाहेर काढलीं आणि त्या शमीच्या झाडाची व त्या शस्त्रांची पूजा केली. नि म्हणून त्या दिवशीं शस्त्रांची पूजा करतात.

आश्विनांत हस्त नक्षत्र लागल्यावर कधीं कधीं हत्तीच्या सोंडेसारखा मुसळधार पाऊस पडतो. या वेळीं शेतकरी गहूं, हरभरा, शाळू वगैरेची पेरणी करतात.

चित्रा नक्षत्र पावसाचें शेवटचें नक्षत्र म्हटलें जातें. पण त्यांत सहसा पाऊस पडत नाहीं. त्यामुळें वेंचणी, कापणी इत्यादि सुगीच्या कामांना तेव्हां सुरुवात होते.

तेव्हां हस्त नक्षत्र हेंच खरें शेवटलें पावसाळी नक्षत्र नि म्हणून त्याचा गौरव करण्यासाठी मुली सोळा दिवस हादगा घालतात.

## हादगा

पाटावर रांगोळीनें किंवा धान्यानें हत्तीचें चित्र काढतात. नि त्याच्याभोंवतीं फेर धरून वाढत्या क्रमानें गाणीं म्हणतात. पहिल्या दिवशीं एक, दुसऱ्या दिवशीं दोन नि शेवटच्या दिवशीं सोळा गाणीं म्हणतात. नंतर खिरापत वाटतात. वांटण्यापूर्वीं खिरापत ओळखण्यासाठीं प्रश्नोत्तरांची गंमत होते.

पावसाळ्या दिवसांत घराबाहेर पडतां येत नाहीं. त्यामुळें कंटाळा येतो. हादगा घातला तर सोळा दिवस कसे मजेंत जातात; करमणूक होते. नि जुन्या गाण्यांना अनायासें उजळा मिळतो. मुलींनीं अवश्य हादग्याचा सण साजरा करावा.



हादग्यांतील गाण्यांचा आंकडा वाढू लागल्यावर तो कार्यक्रम आटोपायला बराच वेळ लागतो. त्यामुळें घरोघरीं हादगा घालण्या-ऐवजीं मुली मुली एकत्र जमून हादगा घालतात नि अशा उत्सवा-मध्यें नेहमींच भाग घेणाऱ्यांच्या संख्येवर करमणुकीचें व आनंदाचें

वैपुल्य अवलंबून असतें ! जितक्या मुली अधिक तितकी गंमत अधिक !

अशा रीतीनें उत्सव साजरे करण्याची लहानपणापासून संवय असणें फार उत्तम ! कारण त्यामुळें एकमेकांचीं मनें सांभाळण्याची कला अंगीं येते, माणुसकी वाढते आणि आपोआप उत्तम नागरिक वनतां येतें. अन् आपली जुनी संस्कृति थोडीफार जिवंत रहाते. अशा रीतीनें एकांत अनेक गोष्टी साधल्या जातात.

आपण देवाचे दशावतार मानतों. पण हे दहाहि अवतार देवाचे-पुरुपाचे आहेत. नवरात्रामधला महिषासुरमर्दिनीचा अवतार हा एकच स्त्रीचा अवतार आहे ! म्हणून शक्तिदेवीची ही कथा आपण लक्षांत ठेवावयास हवी !

**कोजागरी**

ह्यानंतर आश्विन पौर्णिमेला कोजागरीचा सण येतो. आतां पावसाळा संपत आलेला असतो. चार महिने आकाश ढगाळलेलें असे; तें आतां स्वच्छ निरभ्र झालेलें असतें. नि त्यामुळें ह्या पौर्णिमेला फारच शुभ्र, टिपूर चांदणें पडतें.

कौमुदी ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ चांदणें असा होतो. परंतु ह्या कोजागरी पौर्णिमेला कौमुदी म्हणण्याचा प्रघात आहे. नि कोजागरीच्या उत्सवाला त्याचमुळें कौमुदी उत्सव म्हणतात.

ही शरत्पौर्णिमा हा लक्ष्मीच्या पूजेचा दिवस आहे. त्या रात्रीं घरांत चहूंकडे दिवे लावतात आणि लक्ष्मीच्या मूर्तीची पूजा करतात. ह्या पौर्णिमेच्या रात्रीं लक्ष्मी जिकडेतिकडे फिरते आणि जे कोणीं चांदण्याची मजा लुटत जागे असतील त्यांना प्रसन्न होते असें मानतात. म्हणून लोक कोजागरी जागवितात. गाणीं, गप्पा, पत्ते अशा गंमती करीत चांदण्यांत बसतात. त्यामुळें आपल्या

रोजच्या जीवनांत थोडा पालट होतो आणि मनाला व शरिराला उल्हास वाटतो !

तसें म्हटलें तर पौर्णिमा दर महिन्यालाच येते. पण ह्या कौमुदीपौर्णिमेची वेगळीच अपूर्वाई वाटते. तिच्या चांदण्यांतून जणूं अमृत ठिपकतें असें वाटतें. आटीव दूध किंवा पोहे खातांना वेगळीच मौज वाटते. गच्चींत बसल्या बसल्या वनभोजनाचा आनंद लाभतो नि त्यामुळें मनाला व शरिराला आलेली हुषारी कितीतरी दिवस टिकते. मुलें चांदण्यांत हुतुतू, आट्यापाट्या यासारखे खेळहि खेळतात.

रविवारची सुट्टी शाळेला असते. पण असे उत्सव साजरे केले कीं ही सुट्टी सगळ्या घरादाराला असते. घरांतील माणसांना येणाऱ्या कंटाळवाणेपणाला सुट्टी असते ही ! तेव्हां नुसती गंमत म्हणून नव्हे तर एक आवश्यक, उत्साहवर्धक योजना म्हणून आपले असले जुने उत्सव साजरे करावेत.

**दिवाळीचा सण**

आतां ह्यानंतर आपला सबंध वर्षांतला मोठा दिवाळीचा सण येतो. वास्तविक दिवाळी म्हणजे एक सण नसून सणांचें संमेलन आहे. नवरात्रापासून भाऊबिजेपर्यंत लहानमोठे सण येत असतात. आणि धनत्रयोदशीपासून भाऊबिजेपर्यंतचे पांच दिवस विशेषच सोहाळ्याचे असतात.

खरोखर, दिवाळी हें सणांचें अजब घर आहे. एकाहून एक मोठे सण आहेत हे.

**धनत्रयोदशी**

आतां **धनत्रयोदशीपासून** सुरुवात करूं या. दिवाळीला आतां आरंभ झाला, असें ह्या दिवशीं वाटूं लागतें. अपेक्षेच्या

आनंदाचा आरंभ होतो. पुढें दिवाळींतील एकेका सणांत काय काय गम्मत करावयाची हे बेत सुरू होतात. नि प्रत्यक्ष प्राप्तीच्या आनंदापेक्षां ह्या अपेक्षेच्या आनंदाची गोडी न्यारी असते !

दारांच्या पुढ्यांत किंवा अंगणांत जागा सारवायची. त्यावर रांगोळीचा कणा काढावयाचा. पणत्या शोधून काढून, धुऊन पुसून ठेवावयाच्या, हा थोडा कां बोवाळ असतो ? त्यांतच आई, काकू फराळाच्या गोड, तिखट जिनसा करतात त्याचा मासला पहावयाचा.


तिन्हीसांजा पणत्या पेटविल्या म्हणजे दीपावलि--दिव्यांची ओळ—हें नांव सार्थ झालेलें दिसतें !

अन् ह्या दिव्यांच्या चकचकाटांतच धनत्रयोदशीच्या कथेचें सार सांगितलें आहे. ठाऊक आहे का तें तुम्हांला ?

एकदां यमराजानें आपल्या दूताला--नोकराला--प्रश्न केला "काय रे, मृत्युलोकांतून---पृथ्वीवरून—तुम्हीं माणसांचे प्राण हिरावून आणतां. हें काम करतांना तुम्हांला कधीं वाईट वाटण्यासारखा प्रसंग घडला आहे काय ?"

त्यावर दूत हात जोडून म्हणाला, " महाराज, मृत्युलोकांतील हैम राजाच्या मुलाचे प्राण हिरावून आणतांना आम्हांला फार दुःख झालें. ह्या मुलाच्या लग्नाचा सोहळा आनंदानें साजरा होत होता. सगळीकडे उत्साह भरला होता. नि लग्नाच्या चौथ्या दिवशीं त्याचे प्राण हरण करावे लागले आम्हांला ! हा मृत्यु नव्हे अपमृत्यु—वेळेच्या आधीं आलेला मृत्यु--आहे हा ! तेव्हां पुनः असा अपमृत्यूचा प्रसंग कोणावर येऊं नये, अशी आमची विनंति आहे."

दूताचें हें बोलणें ऐकून यमराज गंभीर झाले आणि त्यांनीं म्हटलें,"ठीक आहे ! आज आश्विन वद्य त्रयोदशी--धनत्रयोदशी आहे. आजपासून पांच दिवस जे दीपोत्सव साजरा करतील त्यांच्यावर असा अपमृत्यूचा प्रसंग येणार नाहीं !" आणि तेव्हां-



पासून धनत्रयोदशीच्या दिवसापासून भाऊबिजेपर्यंत दिव्यांचा चकचकाट करण्याची पद्धत पडली.

परंतु नुसत्या दिव्यांच्या रोषणाईनें कां कुठें मरण टळणार आहे ? आपलें आरोग्य नीट राखलें तरच मृत्यु दूर पळेल ! आणि ह्या गोष्टीची स्वत:ला आठवण देण्यासाठीं दिव्यांचा चकचकाट करावयाचा. जणूं ह्या चकचकाटामुळें डोक्यांतहि प्रकाश पडूं शकतो आणि हैम राजाच्या मुलाची ही कथा ऐकल्यामुळें आपण सावध होतों. 'पुढल्यास ठेंच, मागचा शहाणा' म्हणतात तें खरें आहे ! तेव्हां आपल्याला दीर्घ आयुष्य मिळावें, म्हणून शक्य तों निसर्गाच्या नियमांनुसार वागण्याचा ह्या दिवशीं निश्चय करावयाचा आणि पुढल्या धनत्रयोदशीला तो पुढें चालू करावयाचा.

आरोग्य हें मोठ्यांत मोठें धन आहे. तेव्हां धनत्रयोदशीला ह्या आरोग्यधनाची पूजा करण्याइतकें चांगलें दुसरें कांहींच नाहीं ! अर्थात्‌च आपलें आरोग्य पूजा करण्यालायक असावयास हवें ! गेल्या सबंध वर्षांत आपली प्रकृति कशी होती, ह्याचा

आढावा ह्या दिवशीं घ्यावा आणि एकादा दुसरा किरकोळ त्रास सोडला तर प्रकृति ठीक होती असें आढळलें तर आपलें आरोग्य खात्रीनें पूजा करण्यालायक ठरेल !

खरें म्हणजे आपली प्रकृति उगीच किंवा अकारण बिघडत नसते. निसर्ग हा कांटेकोर शिक्षक आहे. नि ह्या शिक्षकानें घालून दिलेले नियम आपण मोडले कीं लगेच त्याची शिक्षा आपल्याला भोगावी लागते. आहार म्हणजे खाणें व विहार म्हणजे व्यायाम ह्या दोन्हीबाबत आपण शिस्तींत वागलों तर आपलें आरोग्य उत्तम राहील ! पण हावरेपणा किंवा चुकारपणा केला कीं, त्याचा वचपा निघालाच ! तेव्हां आरोग्य उत्तम राखणें पुष्कळसें आपल्या हातांत आहे. नि तें उत्तम राखलें तर आपल्या-सारखे श्रीमंत नि सुखी आपणच ! कारण सर्वांत मोठें धन आपल्याला लाभलें आहे ! तेव्हां धनत्रयोदशीला आपल्या आरोग्याची पुजा करण्याच्या योग्यतेचें तें ठरेल अशी काळजी घेऊनच वर्षभर वागावयाचें असा निश्चय करा आणि तो व्यवस्थित पाळा.

## नरक-चतुर्दशी

आतां ह्यानंतर नरक-चतुर्दशीचा सण येतो. आपल्या भारताच्या उत्तरेला नेपाळ व भूतान प्रांताच्या दक्षिणेकडे पूर्वी प्राग्जोतिष नांवाचा एक प्रांत होता. तिथें नरकासुर नांवाचा राजा राज्य करीत असे. तो अतिशय दुष्ट व क्रूर होता. आस-पासच्या अनेक राजांना त्यानें सतावलें होतें. आणि सोळा हजार स्त्रिया त्याच्या कैदेंत होत्या. त्यानें इंद्राचें छत्र हिरावून घेतलें होतें. देवांची आई अदिती हिच्या कानांतील कुंडलें हरण केलीं होतीं; आणि अमर पर्वतावरील मणिपर्व नांवाचें स्थानहि देवां-

पासून काढून घेतलें होतें. आपल्याला कोणी जिंकतां कामा नये, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. आणि म्हणून त्यानें आपल्या राजधानीच्या सभोंवतीं पर्वतांचे व शस्त्रांचे कोट रचले.

नरकासुराचीं दुष्ट कृत्यें श्रीकृष्णाच्या कानांवर आलीं व त्यानें नरकासुराचा नाश करण्याचा निश्चय केला. पण श्रीकृष्णाची बायको सत्यभामा हिनें ती कामगिरी आपल्या शिरावर घेतली. जणूं महिषासुराचा नाश करणारी शक्तिदेवीच! श्रीकृष्ण फक्त तिला मदत करण्यास बरोबर गेला आणि आश्विन वद्य चतु-



र्दशीच्या पहांटे सत्यभामेनें नरकासुराला मारलें व त्याच्या कैदेंतील स्त्रियांना मोकळें केलें. तेव्हां त्यांनीं आपापल्या घरीं दिवे पेटवून, रांगोळ्या काढून आनंद व्यक्त केला. नि त्या प्रीत्यर्थ

आपण अजुनि नरक-चतुर्दशीच्या दिवशीं पहांटे उठून स्नान करतों. नंतर रांगोळी घालून फराळ करतों नि आनंदोत्साहानें हा दिवस साजरा करतों.

सत्यभामेनें नरकासुराचा नाश केला. तिच्या बाबतींत नरकासुर हें विशेषनाम होतें. पण तसल्या सामान्य नामाचा—नरकाचा—नाश नाहीं का आपल्याला करतां येणार? आपल्या घरांत व घराभोंवतीं किती घाण असते. घाण म्हणजे नरक. नि आपण हा नरक नाहींसा केला पाहिजे. घरांतील मोऱ्या व अंगण वगैरे झाडून स्वच्छ ठेवण्यास आईला मदत करावयास हवी! कारण सांडपाणी व कचरा सांचल्यामुळें हवा अशुद्ध होते. आणि त्यामुळें मग रोगराई उत्पन्न होते व पसरते. डी. डी. टी. सारखें जंतुनाशक द्रव्य घरीं करतां येतें नि तें स्वस्त पडतें. तेव्हां असें जंतुनाशक द्रव्य घाण सांचणाऱ्या ठिकाणीं टाकावें. आणि अशा रीतीनें आपलें आरोग्यधन चोरावयास टपून बसलेल्या नरकासुराचा नाश करावा.

मनुष्यप्राणी अनुकरणप्रिय असतो. एका घरांतील मुलें-माणसें असा नरकासुराचा नाश करतांना दिसलीं कीं, आजूबाजूच्या घरांतील मुलें-माणसेंहि आपापल्या घरांतील नरकासुराचा नाश करतील. आणि प्रत्येकानें आपापलें घर व अंगण स्वच्छ ठेवलें कीं सबंध गांव स्वच्छ होईल! तेव्हां ह्या पद्धतीनें आपण नरक-चतुर्दशी साजरी करूं या.

**लक्ष्मी-पूजन**

नरकचतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशीं अर्थातच अमावास्या येते. पण ही अमावास्या सणासारखी मानतात. नि ह्या दिवशीं लक्ष्मीपूजन करितात.

ह्यासंबंधीं अशी कथा आहे. प्राचीन काळीं बळी नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें देवांना कैदेंत घातलें नि लक्ष्मीला आपली दासी बनविली. परंतु बळिराजा दानधर्म करून व्यवस्थित वागत होता. त्यामुळें त्याला शासन करितां येईना. पण हळूहळू त्याची सत्ता वाढू लागली तसा तो धुंद बनला आणि अन्यायानें वागू लागला. तेव्हां श्रीविष्णूनें वामनावतार घेतला आणि बळीचा नाश केला व लक्ष्मीची सुटका केली.

आश्विनांतील अमावास्येच्या दिवशीं लक्ष्मीची सुटका झाली. म्हणून त्या दिवशीं लक्ष्मीपूजन करतात.

दुकानदार व व्यापारी लोक आपल्या जमाखर्चाच्या वह्या, दुकानांतील माल व गल्ला ह्यांची पूजा करितात.

ह्या अमावास्येला गुजराथेंत महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती यांचें पूजन होतें. दौत, रुपया व चोपडी हीं या तीन् देवतांचीं प्रतीकें मानतात.

बंगालमध्यें अमावास्येच्या दिवशीं कालीची पूजा करितात.

दिवाळीच्या ह्या दिवसांत दिव्यांचा चकचकाट असतो. जणू दिवस व रात्र ह्यांतील अंतर नाहींसें होतें. आणि रात्रीचा दिवस होतो. रात्रीचा अंधार नष्ट होतो.

### दिवाळीची सुट्टी

उन्हाळ्याच्या सुट्टीच्या खालोखाल ही दिवाळीची सुट्टी असते. शाळेला पाऊण महिना सुट्टी असते नि अभ्यासाचा तितकासा जोर नसतो. मग ही सुट्टी काय नुसती खाण्यांत, खेळण्यांत दवडायची ? सुट्टीचा सदुपयोग करायला हवा ! ह्या सुट्टींत मुलींनीं घरगुती शिवणकाम चांगलें शिकून घेण्याचा निश्चय करावा.

मुलींना विणकाम, भरतकाम वगैरे प्रकार आवडतात. पण शिवणकामाचा त्या कंटाळा करतात. वस्तुतः शिवणकामच विशेष महत्त्वाचें असतें. तें मुलींनाच नव्हे, तर मुलांनाहि यायला हवें. मुलांनासुद्धां आपल्या सदऱ्याच्या गुंड्या टाचायला येणें उत्तम. त्याचप्रमाणें थोडेंसें फाटलेलें, उसवलेलेंहि त्यांना शिवायला यावें. त्यामुळें माणूस स्वावलंबी होतो. तेव्हां दिवाळीच्या सुट्टींत मुलामुलींनीं घरगुती शिवण शिकावें. ठिगळ लावणें नि रफू करणें ह्यासुद्धां भरतकामासारख्याच कौशल्यपूर्ण कला आहेत. पण मुलींना त्या रुक्ष वाटतात. हें चुकीचें आहे.

आवडती गोष्ट आवडीनें कोणीहि करील. पण आवश्यक गोष्ट आवडीनें करणें खरें महत्त्वाचें आहे ! नि ठिगळ लावणें, रफू करणें, उसवलेलें शिवणें ह्या आवश्यक गोष्टी आहेत. कपडा थोडासा उसवला असला नि तो तेवढ्यांत शिवला तर श्रम वाचतात नि कपडा अधिक फाटण्याचेंहि वांचतें.

इंग्रजींत म्हण आहे कीं, वेळींच एक टाका घातला तर नऊ टांके घालण्याचे वांचतात ! ही अगदीं खरी म्हण आहे. प्रत्येक मुलामुलीनें ही ध्यानांत घ्यायला हवी ! नि सुट्टींत 'वेळींच एक टांका' घालण्याची कला आपण शिकून घेतली पाहिजे.

आजकाल सर्रास चहूंकडे विजेचे दिवे असतात नि बऱ्याचवेळां विजेची 'फ्यूज्' जाते. काळोख नि कामाचा खोळंबा होतो. तेव्हां ही 'फ्यूज्' बसविण्याची कलाहि मुलांमुलींनीं सुट्टींत शिकून घ्यावी.

आणखी इतरहि कला संधि मिळेल त्याप्रमाणें दिवाळीच्या सुटींत शिकून घ्यावयास हव्यात. कारण नुस्ती गंमत करण्यापेक्षां व खेळण्यापेक्षां असल्या कांहीं कला शिकून घेतल्यात म्हणजे

मनाला वेगळाच उल्हास वाटेल ! तुमचा आत्मविश्वासहि वाढेल. आणि तुम्ही कुटुंबांतील एक उपयुक्त व्यक्ति ठराल ! केवढें मानाचें स्थान मिळेल तुम्हांला ? अन् मग पुढल्या सुट्टीचा असाच सदुपयोग करण्याची चुरस वाढेल. नि सुट्टींत मुलें त्रास देतात, दंगा करतात, असें म्हणण्याची वडील माणसांवर पाळी येणार नाहीं !

मग दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सर्वच सुट्ट्यांचा असा सदुपयोग करण्याचा निश्चय करणार ना? करा नि तो नीट पाळा बरं का.

**मुक्ताबाईची जयंती**

आश्विनाच्या शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्र सुरू झालें. नि त्याच दिवशीं मुक्ताबाईची जयंती असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेला मुक्ताबाईचा आळंदी मुक्कामीं जन्म झाला.

निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई असें म्हणतातच. कारण चौघां भावंडांत मुक्ताबाई सर्वांत लहान. धर्मगुरूंच्या सांगण्यावरून ह्यां मुलांच्या आईवडिलांनीं प्राणत्याग केला. तेव्हां निवृत्ति व ज्ञानेश्वर भिक्षा मागून आणीत नि सोपान मुक्ताबाईला सांभाळी.

मोठे तिघे भाऊ विद्वान् निघाले. अर्थात्च मुक्ताबाई मागें कशी राहील ? निवृत्तिनाथाला तिनें आपला गुरु मानलें आणि तीहि ज्ञानी झाली. ती कविता उत्तम करीत असे. तिचे ताटीचे अभंग फार प्रसिद्ध आहेत.

एक दिवस काय झालें, ज्ञानेश्वर नेहमींप्रमाणें भिक्षा मागून घरीं परतले. पण एका टवाळानें त्यांना हिणविलें. " संन्याशाच्या पोराचें दर्शन झालें. अपशकुन झाला हा " असें तो बोलला. हे

२२६३५
२३
बा.वा
२३
३०-९

शब्द ऐकून ज्ञानेश्वर खिन्न झाले आणि दार बंद करून खोलींत बसले. मुक्ताबाईनें हांका मारल्या तरी ताटी-दार-उघडेनात. तेव्हां मुक्ताबाईनें त्यांना पुन: विनंति केली, थोडा उपदेश केला



नि ज्ञानेश्वरांनीं ताटी उघडली. ते हे ताटीचे अभंग !

ज्ञानेश्वरीसारखा बिनमोल ग्रंथ लिहिणाऱ्या विद्वान् वडील भावाला धाकट्या बहिणीनें समजावलें, ह्यावरून मुक्ताबाईची योग्यता कळून येते ! त्या सुंदर अभंगांचा हा नमुना पहा.

**विश्व रागें झालें वन्ही । आपण सुखें व्हावें पाणी ।।**
**योगी पावन मनाचा । साही अपराध जनांचा ।।**

**जीभ दांतांनीं चावली। कोणें बत्तिशी पाडली ।।**
**इतुकें ऐकुनि शांति धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

किती अर्थ भरला आहे ह्या अभंगांत ! रागामुळें जग विस्तव झालें ! मग आपण पाणी होऊन त्याला थंड करावें. पवित्र मनाचे योगी--साधु--तुम्हीं, लोकांनीं अपराध केला तरी तो सहन करावयाला हवा ! आपली जीभ आपल्याच दांतांखालीं सांपडली म्हणून कोणीं बत्तीस दांत का पाडतें ?

ज्ञानेश्वरासारख्या संतांनीं जगाला शांतीचा धडा घालून द्यावयाचा. मग त्यांनीं कसें रागाच्या आधीन व्हावयाचें ?

असें असूनहि क्षणभर ज्ञानेश्वर सामान्य माणूस बनले. रागाचा स्पर्श त्यांच्या चित्ताला झाला ! पण धाकट्या मुक्ताबाईनें त्यांना वेळींच सावध केलें. ज्ञानेश्वर ताटी उघडून बाहेर आले नि मुक्ताबाईला मिठी मारून तिच्या शहाणपणाचें कौतुक केलें.

मुक्ताबाई एवढी शहाणी होती. पण थोड्या महिन्याच्या अंतरानें ज्ञानेश्वर नि सोपानदेव समाधिस्थ होतांच दुःखानें वेडीपिशी झाली. ह्या चौघा भांवडांच्या साखळींतील मधले दोन दुवे खळखळ तुटले नि त्यामुळें मुक्ताबाई व निवृत्तिनाथ खचले.

मुक्ताबाईला हे आघात सहन झाले नाहींत. ती त्यानंतर थोड्याच महिन्यांनीं हें जग सोडून गेली.

संत नामदेवानें ह्याबद्दल असें वर्णन केलें आहे.

**'होती ऐसी नाहीं झाली मुक्ताबाई। संत ठायीं ठायीं स्फुंदताती।'**

मुक्ताबाई गुप्त झाली, त्या ठिकाणापासून दोन मैलांवर एदलाबाद गांवीं हिचें मंदिर बांधलें आहे.

**या आश्विन महिन्यांत** अगदीं पहिल्या दिवसापासूनच सणांना सुरुवात झाली. नवरात्र-दसरा-कोजागरी-धनत्रयोदशी नरकचतुर्दशी नि शेवटीं लक्ष्मीपूजन किती किती सण नि उत्सव! पण सणाच्या दिवशीं पक्वान्नें खाऊन सुस्ती नाहीं येऊं द्यावयाची, जुन्या सणांना नवें वळण लावायचें. आणि आपल्या बुद्धीला चालना देऊन समाजाचें हित साधावयाचें म्हणजे सणापासून मिळणारा आनंद टिकाऊ ठरेल! चार दिवस गोड-धोड खाल्लें कीं संपलें! एवढाच ह्या सणांचा अर्थ नाहीं.

ह्या सणांच्या मुहूर्तावर आपल्या माणसांचें, आपल्या समाजाचें व आपल्या देशाचें हित साधेल, अशा कामांचा प्रारंभ करावयाचा आणि चिकाटीनें तीं शेवटाला न्यावयाचीं. म्हणजे हे सण उत्तम रीतीनें साजरे केले असें होईल!

## स्वाध्याय

(१) नवरात्राचा उत्सव नऊ दिवसच कां करतात ?

(२) दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं सोनें लुटून आणण्याची प्रथा कशी पडली ?

(३) धनत्रयोदशीपासून भाऊबिजेपर्यंत दीपोत्सव साजरा कां केला जातो ?

(४) नरकासुराची आख्यायिका सांगून त्या कथेंतील ग्राह्यांश सांगा.

(५) मुक्ताबाईनें ज्ञानेश्वरांचा राग कसा शांत केला ?

२२६३७
अनुक्रम
विभाग
क्र २३
दा. दि. ३-११-८
वाचनालय ठाणे
IRBK-0106268
IRBK-0106268